PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Hech Majh Maher
Year: 1984

Song: Kalale Kahi Tula
Lyricist: Shanta Shelke

कळले काही तुला
कळले काही मला
लाल आला तुरा गुलमोहरा
हाच प्रितीचा पहिला इशारा
लाल आला तुरा गुलमोहरा
हाच प्रितीचा पहिला इशारा
कळले काही तुला
कळले काही मला

फुल मिटते जरा फुलते जरा
हाच प्रितीचा पहिला इशारा
फुल मिटते जरा फुलते जरा
हाच प्रितीचा पहिला इशारा

होते मनी भाव मी जाणिले
ओठावरी शब्द मी आणिले
होते मनी भाव मी जाणिले
ओठावरी शब्द मी आणिले
लाजेचं येई नवखी धिटाई
रे तोल ढळला पूरा
कळले काही तुला
कळले काही मला
लाल आला तुरा गुलमोहरा
हाच प्रितीचा पहिला इशारा
फुल मिटते जरा फुलते जरा
हाच प्रितीचा पहिला इशारा
ला ला ला ला ला
ला ला ला

हो ये ना जरा
जवळ ओढून घे
हातात ये तूच वेढून घे
हां ये ना जरा
जवळ ओढून घे
हातात ये तूच वेढून घे
गाली गुलाबी धुंदी शराबी
प्याला भरू दे पूरा

कळले काही तुला
कळले काही मला
फुल मिटते जरा फुलते जरा
हाच प्रितीचा पहिला इशारा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*